प्रसिध्दी पत्रक

दिनांक १६/०७/२०२४

**आरोपी लोकसेवक**- 1) श्रीमती ज्योती आनंद गवळी, वय 26 वर्षे, पद- सरपंच, 2) खाजगी ईसम- आनंद रमेश गवळी, वय 32 वर्षे, ( सरपंचपती ) ग्रुप ग्रामपंचायत टाकळीमाळी ता. जिल्हा छत्रपती संभाजीनगर यांनी तक्रारदार यांच्याकडून 50,000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळयात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपतप्रतिबंधक विभाग | | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | : | पोलीस ठाणे करमाड, छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण) येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे |
| आरोपी यांचे नाव व पत्ता | : | 1) श्रीमती ज्योती आनंद गवळी, वय 26 वर्षे, पद- सरपंच, ग्रुप ग्रामपंचायत टाकळीमाळी ता. जिल्हा छत्रपती संभाजीनगर.<br>2) खाजगी ईसम- आनंद रमेश गवळी, वय 32 वर्षे, ( सरपंचपती ) ग्रुप ग्रामपंचायत टाकळीमाळी ता. जिल्हा छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागणी रक्कम | :- | 50,000/- रुपये |
| लाच स्विकृती रक्कम | | 50,000/-रुपये. |
| सापळा अधिकारी | :- | श्रीमती विजयमाला चव्हाण, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | 15 वित्त अयोगातील मंजुर निधीतुन हुसेनपुर गावातील विकास कामाकरिता निधी देण्याकरिता. |
| थोडक्यात माहिती | | यातील तक्रारदार हे ग्रुप ग्रामपंचायत, टाकळीमाळी, येथे उप सरपंच पदावर कार्यरत असून खाजगी ईसम क्रं. 02 आनंद गवळी, सरपंचपती या नात्याने तक्रारदार यांना 15 वित्त अयोगातील मंजुर निधीतुन हुसेनपुर गावातील विकास कामाकरिता 3,00,000/- (तीन लक्ष रुपये) निधी देण्याकरिता खाजगी ईसम क्रं. 02 आनंद गवळी (सरपंचपती) यांनी तक्रारदार यांचेकडे 50,000/- रुपयांची लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर येथे तक्रार दिली.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन दि. 16/07/2024 रोजी पंचासमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी दरम्यान आ.लो.से. क्रं.1) श्रीमती ज्योती आनंद गवळी, सरपंच, खाजगी ईसम 02) आनंद गवळी, सरपंचपती यांनी तक्रारदार यांचेकडे पंचासमक्ष 50,000/- रुपये लाचेची रक्कम मागणी करुन स्विकारणे बाबत निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी आजच दि.16/07/2024 रोजी सापळा आयोजीत केला असता, आ.लो.से. क्रं.1) श्रीमती ज्योती आनंद गवळी, सरपंच यांना लाचेची रक्कम 50,000/- तक्रारदार यांचेकडून राहते घरी टाकळीमाळी येथे स्विकारली आहे. लाचेच्या रकमेसह आ.लो.से. क्रं. 1) श्रीमती ज्योती आनंद गवळी (सरपंच), खाजगी ईसम 02) आनंद गवळी, (सरपंचपती) यांना ताब्यात घेण्यात आले आहे. तक्रारदार यांचे फिर्याद वरुन पोलीस स्टेशन करमाड, छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण) येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मुकुंद आघाव, पोलीस उप अधीक्षक राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विजयमाला चव्हाण यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोलीस हवालदार राजेंद्र सिनकर, बिलास चव्हाण, चालक सी.एन.बागुल यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 9881460103
पोलीस उप अधीक्षक :- 9823498777

( राजीव तळेकर )<br>पोलीस उप अधिक्षक,<br>लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,<br>छत्रपती संभाजीनगर.

Scanned with OKEN Scanner